**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अॅग्रोमेट अॅडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 22-02-2022**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये भिवापूर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-02-22 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-02-23 | 2022-02-24 | 2022-02-25 | 2022-02-26 | 2022-02-27 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 2.3 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 32.4 | 33.2 | 32.7 | 33.4 | 33.8 |
| किमान तापमान (अं.से) | 13.1 | 14.2 | 14.0 | 15.4 | 16.3 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 68 | 69 | 74 | 70 | 67 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 38 | 39 | 45 | 42 | 40 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 8.0 | 9.0 | 11.0 | 11.0 | 10.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 107 | 152 | 191 | 192 | 24 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 2 | 2 | 1 | 2 |

## हवामान सारांश / चेतावणी:

भिवापुर तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार,पुढील पाच दिवस दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ ते २७ फेब्रुवारी २०२२ दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता तसेच, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

परिपक्व अवस्थेतील हरभरा, गहू, मोहरी, जवस इत्यादी पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, मळणी ची कामे शक्य नसल्यास काढणी केलेल्या शेत माल प्लास्टिक शीट ने झाकावे.रब्बी हंगामातील पिके, फळबागा व भाजीपाला पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे, कीड व रोग व्यवस्थापनासाठी लेबल क्लेम आधारित शिफारशीत असलेले कृषी रसायनांची फवारणी ची कामेस्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून करावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

परिपक्व अवस्थेतील हरभरा, गहू, मोहरी, जवस इत्यादी पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, मळणी ची कामे शक्य नसल्यास काढणी केलेल्या शेत माल प्लास्टिक शीट ने झाकावे.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | परिपक्व अवस्थेतील हरभरा पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, मळणी ची कामे शक्य नसल्यास काढणी केलेल्या शेत माल प्लास्टिक शीट ने झाकावे.उशिरा पेरणी व बागायती हरभरा पिकामध्ये घाटेअळी किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के ईसी २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % एसजी ३ ग्राम किंवा फ्लूबेंडीअमाईड २० % डब्ल्यूजी ५ ग्राम किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यत मिसळून फवारणी करावी. |
| गहू | परिपक्व अवस्थेतील गहू पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, मळणी ची कामे शक्य नसल्यास काढणी केलेल्या शेत माल प्लास्टिक शीट ने झाकावे.गहू पिकास जमिनीतील ओलावा व पिकाची गरज लक्षात घेता पिक अवस्थेनुसार फुलोरा अवस्था (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवस), दाण्याची दुधाळ अवस्था (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस) मध्ये असताना सिंचन करावे.गहू पिकामध्ये तांबेरा आणि पानावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅनकोझेब ७५ % डब्ल्यूपी २० ते २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भुईमूग | उन्हाळी भुईमुगपिकामध्ये उगवणीनंतर १० दिवसाच्या आत खांड्या भरून घ्याव्यात. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| अळशी | परिपक्व अवस्थेतील जवस पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, मळणी ची कामे शक्य नसल्यास काढणी केलेल्या शेत माल प्लास्टिक शीट ने झाकावे.जवस पिकामध्ये गादमाशी किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठल्यास (8.77 %गादमाशी) एसिटामिप्रिड २० एसपी २.० ग्राम प्रती १० लिटर किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल २.५ मिली प्रती १० लिटर पाणी किंवा डायमिथोएट ३० % प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. परिपक्व झालेल्या जवस पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| आंबा | आंब्याच्या मोहोरावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास तुडतुडे किडीच्या व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % प्रवाही १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % प्रवाही ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन५ टक्के प्रवाही ५ मिली किंवा मिथाईल डिमेटोन २५ टक्के प्रवाही १० मिली किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.आंबावरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनाझोल ५ टक्के प्रवाही १० मिली किंवा पेनकानझोल १० टक्के प्रवाही ५ मिली किंवा सल्फर ८० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ३० ग्राम किंवा डिनकॅप ४८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| संत्रा | सर्वसाधारणपणे लिंबूवर्गीय लीफ मायनर व सायला या किडी या काळात सक्रिय असतात. लिंबूवर्गीय सायला किडीच्या नियंत्रणासाठी अंबिया बहराच्या वेळी इमिडाक्लोप्रीड ०.५ मिली, क्विनालफॉस २ मिली किंवा डायमेथोएट २ मिली प्रती एक लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. लीफ मायनर किडीच्या व्यवस्थापनासाठी थायामेथोक्सॅम ०.३ ग्रॅम किंवा फेनव्हॅलेरेट १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १० दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी करावी. लिंबूवर्गीय मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास क्विनालफॉस @ 2 मिली किंवा डायमेथोएट @ 2 मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. झाडाच्या खोडावर डिंकाचा स्त्राव निघत असलाय्स डिंकाचा भाग धारदार चाकूने काढून टाका आणि झाडाच्या खोडाच्या प्रभावित भागावर मेटालॅक्सिल पेस्ट किंवा फॉसेटीलएएल ची पेस्ट लावावि. या काळात पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. पाने खाणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी क्विनालफॉस २ मिली किंवा फेनव्हॅलेरेट २ मिली प्रती एक लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबिया बहाराच्या वेळी जिबरेलिक आम्ल १.५ ग्राम सोबत १ किलो युरिया १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. (पाण्यात मिसळण्यापूर्वी 10 मिली अल्कोहोलमध्ये गिबेरेलिक ऍसिड विरघळवा) |
| मिरची | मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| कोबी | पानकोबी पिकामध्ये मावा (हिरवा व काळा), चौकोनी ठिपक्याचा पतंग व तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टोमॅटो | टमाटे पिकामध्ये नागअळी, मावा, फुलकिडे, पंढरी माशी व फळे पोखरणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १८.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | शेळ्यांच्या करडा च्या अंगावर गोचीड पिसावांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास करडांना समप्रमाणात राख व ५० % कार्बारील पावडर मिसळून अंगावर चोळावी. जास्त प्रादुर्भाव असल्यास २ मिली ब्यूटोक्स किंवा अमित्राझ औषध टाकून शेळ्या व करडांना अंघोळ घालावी. कीटक नाशकाचा वापर अतिशय सावधपणे करावा व करडांना चाटून विषबाधा होणार नाही याची काळजी घ्यावी. शेळ्या व मेंढ्या यांना बुळकांडी रोगप्रतिकारक लसीकरण करावे. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | उन्हाळी हंगामात ओलिताची उपलब्धता आणि बाजाराची गरज लक्षात घेता पालेभाज्या, भेंडी, गवार, चवळी, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबूज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीर यांची लागवड करावी. |
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |